यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231478

विद्यार्थी सेवा विभाग / Student Services Division

जा.क्र. – विसेवि/२०२४/७५९ दिनांक : १० मे २०२४

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्र मान्यतेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ

सूचनापत्र-

पारंपारिक विद्यापीठाची मान्यता असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयात मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे खाली दर्शविलेल्या शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र सुरु करण्यासाठी तसेच सध्या कार्यान्वित असलेल्या अभ्यासकेंद्रावर अधिकचे नवीन शिक्षणक्रम सुरु करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दिनांक १० जून २०२४ ते २५ जून २०२४ पर्यंत मुदतवाढ करण्यात येत आहे. विद्यापीठाने शिक्षणक्रम अंतिम मान्यता दिल्यानंतरच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील त्या त्या शिक्षणक्रमाचे प्रवेश संबंधित अभ्यासकेंद्रावर उपलब्ध होतील.

३) Application for New Learner Support Center : ज्या वरिष्ठ महाविद्यालयांना मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे खाली दर्शविलेल्या शिक्षणक्रमांचे अभ्यासकेंद्र नव्यानेच सुरु करावयाचे आहे अशा वरिष्ठ महाविद्यालयांना या प्रक्रियेतून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

४) Application for Additional Program : सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासकेंद्रांवर सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या खाली दर्शविलेल्या शिक्षणक्रमांची मान्यता घ्यावयाची आहे अशा वरिष्ठ महाविद्यालयांना या प्रक्रियेतून ऑनलाईन अर्ज सादर करता येतील.

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा शिक्षणक्रम

अ.क्र.	शिक्षणक्रम संकेतांक	शिक्षणक्रमाचे नाव
१	G01	बी.ए. पदवी शिक्षणक्रम (२००० Pattern)
२	G12	बी.ए. (उर्दू माध्यम) पदवी शिक्षणक्रम (२०११ Pattern)
३	P04	ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B.Lib. & I.Sc.) (१९९६ Pattern)
४	P16	ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.Lib. & I.Sc.) (२००० Pattern)
५	G15	बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम (B.A. in MCJ) (२००० Pattern)
६	M58	लोकप्रशासन पदव्युत्तर पदवी (एम.ए.) शिक्षणक्रम (M.A. Public Administration) (2023 NEP Pattern)
७	M49	मराठी पदव्युत्तर पदवी (एम.ए.) शिक्षणक्रम (M.A. Marathi) (2023 NEP Pattern)
८	M50	अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.ए.) शिक्षणक्रम (M.A. Economics) (2023 NEP Pattern)
९	M60	इतिहास पदव्युत्तर पदवी (एम.ए.) शिक्षणक्रम (M.A. History) (2023 NEP Pattern)
१०	M59	हिंदी स्नातकोत्तर शिक्षाक्रम (एम.ए.) (M.A. Hindi) (2023 NEP Pattern)
११	M48	उर्दू पदव्युत्तर पदवी (एम.ए.) शिक्षणक्रम (M.A. Urdu)

ऑनलाईन प्रस्ताव सदर करण्यासाठी शुल्क संरचना :

४) Application Fee (एका अभ्यासकेंद्राच्या विद्याशाखांच्या सर्व शिक्षणक्रमांसाठी रु.१,०००/- (विनापरतावा)

५) Recognition Fee (प्रत्येक विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांसाठी स्वतंत्रपणे – विद्यापीठ स्तरावरील यशस्वी पडताळणीनंतर) रु.१०,०००/-

६) Programme Fee (शिक्षणक्रम निहाय – विद्यापीठ स्तरावरील यशस्वी पडताळणीनंतर) रु. ५,०००/-

शिक्षणक्रम मान्यता निकष :

७) G01 - बी.ए. पदवी शिक्षणक्रम (२००० Pattern) – पारंपारिक विद्यापीठाची कला शाखेच्या पदवी शिक्षणक्रमाची मान्यता

८) G12 - बी.ए. (उर्दू माध्यम) पदवी शिक्षणक्रम (२०११ Pattern) - पारंपारिक विद्यापीठाची कला शाखेच्या (उर्दू माध्यम) पदवी शिक्षणक्रमाची मान्यता

९) P04 - ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम (B.Lib. & I.Sc.) (१९९६ Pattern) - पारंपारिक विद्यापीठाची कला शाखेच्या पदवी शिक्षणक्रमाची मान्यता

१०) P16 - ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम (M.Lib. & I.Sc.) (२००० Pattern) – ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रमांची (B.Lib.) शिक्षणक्रमास मुक्त विद्यापीठाची / पारंपारिक विद्यापीठाची मान्यता.

११) G15 - बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम (B.A. in MCJ) (२००० Pattern) - पारंपारिक विद्यापीठाची बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम (B.A. in MCJ) मान्यता

१२) पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (अ.क्र. ६ ते ११) – अभ्यासकेंद्र मान्यता निकष याच पेजवर स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत त्याचा संदर्भ घ्यावा.

पदवी पातळीवरील शिक्षणक्रम समंत्रक निकष :

- संबंधित विषयाचा पदव्युत्तर पदवी शिक्षक / प्राध्यापक म्हणून पारंपारिक विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक.
- ज्या शिक्षणक्रमाच्या मान्यतेसाठी अर्ज करीत आहात त्या शिक्षणक्रमाच्या सर्व विषयांना समंत्रक असणे व त्यांची माहिती ऑनलाईन अर्जात भरणे अनिवार्य.
- एका समंत्रकास जास्तीत जास्त तीन विषय देता येतील.

पदव्युत्तर पदवी पातळीवरील शिक्षणक्रम समंत्रक निकष :

- पदव्युत्तर पदवी पातळीवरील (अ.क्र. ६ ते ११) समंत्रक निकष याच पेजवर स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत त्याचा संदर्भ घ्यावा.

ऑनलाईन अर्ज भरताना घ्यावयाची काळजी

९) ऑनलाईन अर्ज सादर करताना शिक्षणक्रमासंदर्भातील आवश्यक सर्व माहिती भरावयाची आहे. ज्या शिक्षणक्रमासाठी अर्ज करीत आहात त्या शिक्षणक्रमाच्या सर्व विषयासाठी समंत्रक देणे अनिवार्य आहे. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या सर्व विषयांसाठी समंत्रक द्यावयाचे आहेत. एका समंत्रकाला प्रत्येक स्तरावरील शिक्षणक्रमासाठी जास्तीत जास्त तीन विषय देता येतील. समंत्रकांची शैक्षणिक माहिती भरताना पदव्युत्तर आणि संशोधन स्तरावरील शैक्षणिक माहिती भरावी आणि त्या अनुषंगाने कागदपत्रे अपलोड करावीत.

१०) ऑनलाईन अर्ज सादर करताना Staff Profile मध्ये Staff ची माहिती भरावी. त्यानंतर त्यांचे त्यांचे role assign करावेत. समंत्रकांचे विषय map करावेत. सर्व विषय map झाले आहेत याची खात्री करून रु.१०००/- Registration fee ऑनलाईन पद्धतीने भरावे. त्यानंतर स्वयंमुल्यांकन करून अर्ज पूर्ण भरला गेला आहे याची खात्री करून तो अर्ज Confirm करावयाचा आहे. आपण अर्ज Confirm केल्यानंतरच तो विद्यापीठ लॉगीनमध्ये उपलब्ध होतो.

११) कागदपत्रे अपलोड करताना jpeg आणि pdf format चालतील. कागदपत्राच्या फाईलची साईज १०० ते १९० kb या मर्यादेत ठेवावी म्हणजे संबधित फाईल सुलभरीत्या अपलोड होईल.

१२) आपण अर्ज Confirm केल्यानंतर त्याची विद्यापीठ स्तरावर पडताळणी (Scrutiny) होईल. अर्जात काही त्रुटी असतील तर त्या तुम्हाला तुमच्या नोंदणीकृत मेलवर कळविल्या जातील आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी तुमचा अर्ज तुमच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होईल. संबंधित त्रुटींची पूर्तता आपण ऑनलाईन पद्धतीने करून अर्ज पुन्हा confirm करावा. विद्यापीठ स्तरावर पडताळणी (Scrutiny) झाल्यानंतर Affiliation Fee आणि Program Fee भरण्यासाठी Payment Option उपलब्ध होईल.

१३) शिक्षणक्रम मान्यतेसाठीच्या ऑनलाईन अर्जाची पडताळणी (Scrutiny) विद्यापीठ स्तरावर झाल्यानंतर पात्र ठरणारे अर्ज, Affiliation Fee आणि Program Fee ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी Payment Option उपलब्ध होईल. त्यासाठी संबंधित अभ्यासकेंद्रांनी त्यांचे नोंदणीकृत ई-मेल वेळोवेळी तपासून विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनानुसार Affiliation Fee आणि Program Fee ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. सदर शुल्क भरण्याची मुदत ई-मेल मिळाल्यापासून तीन दिवसाच्या आत भरावयाचे आहे.

१४) अभ्यासकेंद्रांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जाचे Status अभ्यासकेंद्र लॉगीनमधून वेळोवेळी तपासावयाचे आहे. अर्जाच्या Status मध्ये "Make Payment" असा शेरा येताच Affiliation Fee आणि Program Fee ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. त्यासाठी शुल्क भरण्याची मुदत "Make Payment" असे Status आल्यापासून तीन दिवसाच्या आत भरावयाचे आहे.

१५) अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रियेबाबतच्या सर्व अभ्यासकेंद्रासाठीच्या सूचना वेळोवेळी विद्यापीठ पोर्टलवरून जाहीर करण्यात येतील.त्यानुसारआवश्यक ती पुढील कार्यवाही संबंधित अभ्यासकेंद्रांनी दिलेल्या मुदतीत करणे पूर्ण आवश्यक आहे.

१६) शिक्षणक्रम मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने सादर करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी दिनांक १0 जून २०२४ ते ते २५ जून २०२४ या कालावधीत दररोज सायंकाळी ४:३० ते ५:२५ या वेळेत Google Meet द्वारे ऑनलाईन बैठका आयोजित करण्यात येत आहेत. Google Meet लिंक याच पेजवर उपलब्ध होईल. प्रस्ताव सादर करताना सादर करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करून घेण्यासाठी संबंधितानी ऑनलाईन बैठकीत ठीक ४:३० वाजता सहभागी व्हावयाचे आहे. ऑनलाईन बैठकीस ना PC किवा Laptop वरून सहभागी व्हावे. बैठकीत सहभागी झाल्यानंतर आपली अडचण मांडण्यासाठी Hand Raise करावा. आपल्या नावाची घोषणा होताच आपल्या अडचणीचा स्क्रीन शेअर करावा. (प्रत्येक शनिवारी आणि रविवारी तसेच सार्वजनिक सुटीच्या दिवशी ऑनलाईन बैठक होणार नाही.)

संचालक
विद्यार्थी सेवा विभाग

- तांत्रिक माहितीसाठी संपर्क :
  श्री. दुर्गेश वरसाळे (DU Coordinator, MKCL) – Email ID duycmou@mkcl.org

- शैक्षणिक माहितीसाठी संपर्क :
  डॉ. प्रमोद पवार (शैक्षणिक संयोजक) Email ID – pramodspawar@ycmou.ac.in

टीप : १) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मोबाईल संपर्क साधावयाचा आहे.

२) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी तसेच शासकीय सुट्याच्या दिवशी विद्यापीठ कार्यालय बंद राहील.